Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-IX Sept. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालय, कुऱ्हा येथील नियतकालिकांचे अध्ययन

**रंजनसेन दे. शेंडे**
कुऱ्हा,
ता. तिवसा जिल्हा. अमरावती

**सारांश (Abstract):-**

ज्ञान माणसाची आज प्राथमिक गरज बनलेली आहे. ज्ञानं संपन्न व्यक्तीच फक्त आधुनिक युगामध्ये स्पर्धा करू शकतो. या स्पर्धेमध्ये टिकून राहण्याकरिता सार्वजनिक ग्रंथालयांनी खेडोपाडी आपली दालने खुली करून दिलेली आहे. आधुनिक ग्रंथालये सर्व बाबींनी परिपूर्ण आहेत. सार्वजनिक ग्रंथालयांना वाचक नाही हे विधान फोल ठरले आहे. आज सार्वजनिक ग्रंथालये व्यवसायाचे किवा वर्तमानपत्र वाचनाचे ठिकाण नसून मानवाच्या सर्वांगीण विकासात भर घालणारे साधन ठरले आहे.

- याकरिता कुऱ्हा या छोट्याश्या गावातील 'इतर अ' दर्जा प्राप्त शासनमान्य शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालायामध्ये नित्यनेमाने येणाऱ्या ३० वाचकांच्या माध्यमातून माहितीचा प्राथमिक स्त्रोत असणा या नियतकालिकांचा अभ्यास करण्यात आला. ग्रंथालय नियतकालिके, ग्रंथालयात येण्यामागचा उद्देश, नियतकालिकांबद्दलची आवड इ. प्रश्न विचारून माहिती गोळा केली असता असे निदर्शनास आले की, नियतकालिकांचा उपयोग हा ग्रामीण भागामध्ये सुद्धा ज्ञानं संकलन व अध्ययनाकरिता होतो. शेती व्यवसाय, स्पर्धा परीक्षा, धर्माचरण, मनोरंजन इ. साठी ग्रामीण भागातील वाचनालय वाचकांच्या ज्ञानाची भूक भागवीत आहे. त्यामुळे निश्चितच वाचनालये एका नव्या परिवर्तनवादी दिशेकडे वाटचाल करीत आहे. त्यासाठी माध्यम म्हणून ग्रंथ, वृत्तपत्रे व नियतकालिके यांची निवड केली जाते.

**प्रस्तावना :-**

१९६७ मध्ये महाराष्ट्र ग्रंथालय अधिनियम मंजूर करण्यात आला व शहरापासून तर खेड्यापर्यंत महाराष्ट्रातील सामन्यातील सामान्य माणसासाठी ज्ञानाची दारे खुली झाली. ग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे यांच्या माध्यमातून प्रत्येकाला चालू घडामोडीपर्यंत पोहचण्याची संधी प्राप्त झाली. ग्रंथालयाकडे केवळ शिक्षण किंवा व्यवसाय अशा विशिष्ट दृष्टीकोनातून न बघता समाजाच्या संस्काराचे व उत्थानाचे एक माध्यम म्हणून बघितले पाहिजे. वाचनातून समाजमन तयार होत असते, व हे समाजमन सामाजिक तसेच राजकिय स्थित्यंतर करीत असते. म्हणजेच राष्ट्र उभारणीसाठी सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान असते हे नाकारता येत नाही.

सार्वजनिक ग्रंथालय हि संकल्पना समजून घेत असतांना ज्युलिअस सिझर या राजाच्या काळाचा विचार करावा लागेल. तसेच इ.स. १५०० पासून इंग्लंड, फ्रांस, जर्मनी इ. देशामधून सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्थापनेची सुरवात झाली. हि ग्रंथालये विशिष्ट व मर्यादित वाचकांना सेवा देत असली तरी सार्वजनिक ग्रंथालयाच्या स्थापनेची सुरवात होती. या सोबतच इंग्लंड, अमेरिका यासारख्या राष्ट्रांमध्ये राजाश्रयाच्या माध्यमातून सार्वजनिक ग्रंथालये चालविल्या गेली. यामुळे जनतेच्या जीवनावर अनुकूल परिणाम झाल्याचे दिसून येते. इ. स. १६५३ मध्ये हंफ्रे चेथॅम या दात्याने इंग्रजी ग्रंथ खरेदी व ग्रंथालयासाठी उपयुक्त जागा खरेदी करण्यासाठी मंचेस्टर ला तत्कालीन २२ पौंडांची देणगी दिल्यामुळे त्या काळामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाची उपयुक्तता असणारे लोक दिसून येतात. कालांतराने १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात विल्यम एवर्ट यांनी ब्रिटीश म्युझिअम ॲक्ट १८४५ व सार्वजनिक

ग्रंथालय कायदा १८५० च्या अंमलबजावनीसाठी अतोनात प्रयत्न केले. विल्यम एवर्ट यांच्या प्रयत्नांना एडवर्ड यांनी कृतीची जोड दिली. एडवर्ड हे मंचेस्टर येथे स्थापन झालेल्या पहिल्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल होते. सार्वजनिक ग्रंथालय कायद्याची अंमलबजावणी व सेवा विषयी त्यांनी जी तत्वे सन १८४९ मध्ये निश्चित केली ती आजही प्रभावी आहे. त्यांच्या मते, सार्वजनिक ग्रंथालय सेवा हि कोणत्याही इच्छुक नागरिकास विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली पाहिजे. त्याच प्रमाणे ग्रंथालय सेवा हि स्थानिय जबाबदारी मानून त्यासाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद करदात्यांनी सरकारला दिलेल्या रक्कमेतून काढण्यात आली पाहिजे. करदाते या सेवेचा वापर करो अथवा न करो सर्व प्रकारचे ग्रंथ या संग्रहात समाविष्ट होणे आवश्यक आहे. याचा प्रभाव इंग्लंड च्या सार्वजनिक ग्रंथालय १८५० तयार करतांना झालेला दिसून येतो.

**सार्वजनिक ग्रंथालय :-**

साधारणपने सार्वजनिक ग्रंथालय म्हटले की, लोकांनी लोकांसाठी चालविलेले ग्रंथालय हि कल्पना आपल्या डोळ्यासमोर येते. हि ग्रंथालये सरकार स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका, ग्रामपंचायत किंवा स्वायत्त नोंदणीकृत संस्था मार्फत चालविली जात असल्याने जनतेच्या प्रतिसादावर त्यांचे भवितव्य अवलंबून असते. एवर्ट यांच्या मते, "जे ग्रंथालय जनतेद्वारे स्थापित, जनतेला समर्पित, जनतेच्या मनोरंजनाकरिता निश्चिछत नियमांद्वारे स्थापित व जनतेच्या खर्चाने संचालित असेल अशा ग्रंथालयांना सार्वजनिक ग्रंथालय असे म्हणतात."

ए. बी. रुसेल यांच्या मते, "सार्वजनिक ग्रंथालय वास्तविक जनतेकारिता, जनतेद्वारे संचालित लोकसंख्या आहे." म्हणजेच सार्वजनिक ग्रंथालये कोणताही पक्षपात न करता समाजातील सार्व स्थरातील लोकांना सेवा देऊन नवसमाजाच्या निर्मितीस हातभार लावण्याकरिता ज्ञानाचे सामाजिकरण करते.

**उद्दिष्ट्ये :-**

ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. रंगनाथन यांनी सांगितलेल्या पंचसूत्रीवर ग्रंथालयशास्त्र आधारलेले आहे, की ज्यावरून आपण ग्रंथालयाची उद्दिष्ट्ये पूर्ण करू शकतो.

1. Books are for use.
2. Every readers its book.
3. Every books its reader.
4. Save the time of the reader.
5. Library is growing organism.

ग्रंथालयामध्ये येणारा वाचक लक्षात घेऊन कमीत कमी वेळामध्ये वाचकाला आवश्यक असणारे ज्ञान, ग्रंथ, माहिती मिळवून देणे हे ग्रंथालयीन सेवकांचे सुद्धा कर्तव्य आहे. सोबतच ग्रंथालयाचा उपयोग झाला पाहिजे जेणेकरून विकासाला हातभार लागेल. कारण ग्रंथालय हि सामाजिक संपत्ती तसेच सेवाभावी संस्था आहे. व ग्रंथालय शास्त्राची हि पाच सूत्रे सार्वजनिक ग्रंथालयाचे आधार स्तंभ आहे.

**शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालय, कुऱ्हा :-**

शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयाची स्थापना सन १९७० मध्ये स्व. बबनराव बिंड यांच्या कल्पनेतून झाली. एक शिक्षक या नात्याने ग्रामीण भागातील ज्ञानाची गरज त्यांच्या लक्षात आली. सन १९७१ मध्ये ग्रंथालयाला शासन मान्यता मिळाली व 'ड' दर्जा प्राप्त होऊन कुऱ्हा गावासारख्या छोट्याश्या खेड्यामध्ये वैचारिक

प्रतीस्थापनेचा श्रीगणेशा झाला. त्यानंतर लगेच सन १९७४ मध्ये 'क' व सन १९८५ मध्ये 'ब'दर्जा प्राप्त झाला. स्वर्गीय बबनराव बिंड यांच्या निधनानंतर हि जबाबदारी मा. गीरीधरराव रोडगे यांनी सांभाळली. ४१ वर्षाच्या दीर्घ तपानंतर सन २०१२ मध्ये वाचनालयाला 'इतर अ' दर्जा प्राप्त झाला. व मा. रोडगे सरांच्या प्रयत्नातून एका छोट्याशा रोपट्याचे ज्ञानवृक्षात रुपांतर झाले. सद्यस्थितीत वाचनालयाची सभासद संख्या ५२३ असून वार्षिक वाचक सरासरी २०१०० आहे. व वाचनालय तालुक्का ग्रंथालय म्हणून प्रस्तावित आहे.

**ग्रंथालयातील उपलब्ध वाचन संग्रह :**

ग्रंथालयात जुलै २०१६ अखेर पुढील प्रमाणे उपलब्ध वाचन संग्रह आहे.

| अ. क्र. | संग्रह | संख्या |
|---|---|---|
| १ | ग्रंथ | १९०१६ |
| २ | नियतकालिके | १०१ |
| ३ | संदर्भ ग्रंथ | ८७ |
| ४ | वृत्तपत्रे | १८ |

ग्रंथालयामध्ये एकूण १९०१६ ग्रंथ संग्रह असून नियतकालिकांची संख्या १०१ आहे. संदर्भ ग्रंथ ८४ आहे. तर वृत्तपत्रांची संख्या १८ असून यामध्ये हिंदी, इंग्रजी व मराठी भाषेतील वृत्तपत्रांचा समावेश आहे.

- ग्रंथालयाला आज वाचक मिळत नाही अशी ओरड व चर्चा नेहमीच ऐकायला येते. परंतु वास्तव काही वेगळेच आहे. याकरिता शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालय, कुऱ्हा येथील ग्रंथालयीन वाचकांच्या सहाय्याने तेथे उपलब्ध वाचन संग्रहामधील माहितीचे प्राथमिक स्त्रोत म्हणून नियतकालिकांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला.

**नियतकालिके:**

नियतकालिके ही ग्रंथापेक्षा वेगळी असतात. कारण नियतकालीकांमधील नवनवीन माहिती सातत्याने प्रकाशित होत असते. माहितीचा प्राथमिक स्त्रोत म्हणून नियतकालिकांचा उल्लेख केला जातो.

According to Oxford English Dictionary, "A periodicals publication containing articles by various writers a periodical publication extended for a general rather than learned or professional readers, and consisting of a miscellany of critical & descriptive articles essay works of fiction etc."

श. भ. सार्व. वाचनालयातील नियतकालिके पुढील कालावधीनुसार आहेत.

| कालावधी | संख्या |
|---|---|
| त्रैमासिके | ०७ |
| मासिके | ५७ |
| पाक्षिके | ०५ |
| साप्ताहिके | १४ |
| एकूण | १०१ |

-

- वरील तक्त्या नुसार ग्रंथालय मध्ये मासिकांची संख्या सर्वात जास्त ५७ आढळून आली. यावरून नवनवीन माहितीचे हस्तांतरण ग्रंथालयात होते हे सिध्द होते व एकुण संख्येवरून ग्रंथालयामध्ये प्राथमिक माहितीची आदान प्रदान होते हे लक्षात येते.

**ग्रंथालय भेटीची उद्दिष्टे :**

वाचक ग्रंथालयाला भेट देत असतांना त्याचा कोणता उद्देश असतो हे अभ्यासण्यात आले. ग्रंथालयात वाचकांना नमुना निवडीच्या तंत्रानुसार प्रश्न विचारण्यात आले.

| प्रश्न | वाचक | टक्केवारी |
|---|---|---|
| ग्रंथ नेण्यासाठी | ५ | १६.६६ |
| ग्रंथ चौकशी | २ | ६.६६ |
| वर्तमान पत्र वाचण्याकरिता | १० | ३३.३३ |
| सामान्य ज्ञानं वाढविण्याकरिता | ७ | २३.३३ |
| नियत कालिके वाचानाकरिता | ६ | २०.०० |
| एकूण | ३० | ९९.९८ |

वरील तक्त्यानुसार ग्रंथालयामध्ये येणा या २०% वाचक नियतकालिके वाचनाकरिता व त्यामधील नवनवीन माहिती शोधान्याकरिता येतात, असे आढळून आले.

त्याचप्रमाणे ग्रंथालयामध्ये वेगवेगळ्या विषयांशी संबंधीत नियतकालिकांचा वाचकाद्वारे किती प्रमाणात उपयोग होतो हे शोधण्याचा प्रयत्न केला. ते पुढील प्रमाणे

| अ. क्र. | विषय | वाचक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कृषी विषयक | ५ | १६.६६ |
| २ | राजकारण विषयक | ३ | १०.०० |
| ३ | धार्मिक नियतकालिके | ३ | १०.०० |
| ४ | स्पर्धा परीक्षा नियतकालिके | ८ | २६.६६ |
| ५ | शैक्षणिक नियतकालिके | ६ | २०.०० |
| ६ | बाल | ३ | १०.०० |
| ७ | इतर | २ | ०६.०० |
| | एकूण | ३० | ९९.९८ |

वरील तक्त्यानुसार स्पर्धा परीक्षा विषयक नियतकालिकांचा सर्वात जास्त २६.६६% वाचकांनी पसंती दर्शविली. शेतीशी संबंधित नियतकालिकांचे प्रौढ व तरुण वाचक १६.६६% आढळून आले. राजकारण व धार्मिक विषयावरील नियतकालिके सुद्धा वाचकांना आकर्षित करतात. तरुण व विद्यार्थी शैक्षणिक नियतकालिकांचा उपयोग करतात. नियतकालिकांच्या आवडीमध्ये स्पर्धा परीक्षा, स्पर्धा परीक्षा व्हिजन, नोकरी संदर्भ, रोजगार, चाणक्य मंडळ परिवार, बळीराजा, गोडवा, लोकराज्य ,योजना मराठा मार्ग, योग संदेश, चंपक इ. नियतकालिकांना वाचकांनी पसंती दर्शविली.

**निष्कर्ष :-**

-- शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालय, कुऱ्हा येथील 'अ' दर्जा प्राप्त ग्रंथालयाच्या नियतकालिकांच्या अध्ययनातून काही महत्वपूर्ण बाबी आढळून आल्या त्या पुढील प्रमाणे:

१. सार्वजनिक वाचनालयाकडे वाचकांचा कल व पाहण्याचा दृष्टीकोन हा सकारात्मक आढळून आला.

२. वाचक ग्रंथालयामध्ये वृत्तपत्र, ग्रंथ, नियतकालिके यांच्या वाचनातून आपले ज्ञान वाढविण्याच्या उद्देशाने येत असतो.

३. मासिके हे अद्ययावत ज्ञानं प्रदान करतात.

४. आजच्या स्पर्धेच्या युगात कृषी, राजकारण, शिक्षण व अन्य क्षेत्रामध्ये आपले पाउल मजबूत करण्याकरिता ग्रामीण भागातील नागरिक वाचनालयाला मध्यम मानतो.

५. सार्वजनिक वाच्नालायामध्ये येणारा वाचक हा बाल, प्रौढ, विद्यार्थी, शेतकरी, गृहिणी इ. प्रकारचा असतो. यावरून जग एका नवीन ज्ञानधिष्टीत दिशेकडे मार्गक्रमण करीत आहे.

६. सार्वजनिक वाचानालये ज्ञानाची भूक भागवू शकतात. हे सिद्ध झाले.

७. पुरुषांच्या तुलनेत महिला सुद्धा सार्वजनिक ग्रंथालयाचा उपयोग घेतात.

८. ग्रामीण भागाच्या तुलनेत श. भ.सार्व. वाच. वाचनविषयक साहित्य वाचकांपर्यंत पोहचविण्यात सक्षम आहे, हे सिद्ध होते.

वरील अभ्यासावरून असे दिसून येते की, शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयातील नियतकालिके व इतर वाचन साहित्य वाचकांसाठी उपयुक्त असून त्याचा उत्तरोत्तर फायदा होईल. यावरून ग्रंथालयाची उपयोगिता लक्षात येते.

**संदर्भ सूची :**

१. Ambiya, G., "Use of Periodicals in Delhi University ScienceLibrary, IIT Library, NPL Library : a comparative study", June 1991, 41(2) p. n. 98-108.

२. Gupta, P. K. and P, Usha, "Library and Information Science", 1986.

३. महाजन, शां. ग., "महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन", पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, २०११.

४. कांबळे, नागेश.आणि सावे, वसंत.,"सार्वजनिक ग्रंथालये" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, २००६.

५. जैन, प्रकाश (et. all) "सुलभ ग्रंथालयशास्त्र", विश्व प्रका. व वितरक नागपूर,२००९.

६. Gents, J. K., "Introduction of Librarianship", 1968, p. 68.

७. वार्षिक अहवाल श. भ. सार्व. वाच., कुऱ्हा. २०१४ २०१५.

८. दाखल नोंद वही श. भ. सार्व. वाच., कुऱ्हा.